Date 1/9/

" सहिष्णूता "

कशी असते सहिष्णूता ??
आडवे उभे धागे विणून
बनते जसे सुंदर वस्त्र
आणि त्या वस्त्राचे
मऊ मुलायम पोत
आनंदित करते जसे तनामनाला, तशी असते सहिष्णूता --
सुखदुःखाला एकत्र गुंफून
जीवनाचा अर्थ उलगडून सांगत असते सहिष्णूता !! ---

झऱ्यातील निर्मल पाण्यातील लुभार
खळखळ करीत वाहती प्रवाहासवे
लाटेमधील निर्व्याज, तरल तरंग
सुखावितो जसे तनामनाला, सहिष्णूताही तशीच असते
मनातील विविध भावरंग
तळाशी जपून ठेवणारी, विविधतेतून एकता सांगणारी
जगण्याचा अर्थ जोपासणारी, अशी असते सहिष्णूता !! ----

विविध जाती धर्म पंथांना
एकदिलाने अलगद रेशीमगाठीत बांधते सहिष्णूता
निष्पर्ण शिशिरानंतर वसंतासवे
डोलणारी, सुखावणारी वृक्षवल्लरी
अंबरात केशरी सडा शिंपूनी
उगवत्या सुर्याचे स्वागत करणारी वसुंधरा
संतांच्या शिकवणूकीतून
आईच्या अंगाई गीतातून
भारतमातेची परंपरा सांगणारी
अन् मनामनाला जोडणारी, अशी असते सहिष्णूता !! ----

सौ. विणया पुरुषोत्तम जोशी.

my companion